जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
(उपचिटणीस शाखा)
दुरध्वनी क्र.०२४७२-२२७३०१ Email id:- rdc1osmanabad@gmail.com फॅक्स क्र.०२४७२-२२८०१८

संदर्भ:- १. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५
२. भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७
३. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८ /आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०
४. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, यांचे आदेश क्रमांक अधिसूचना क्रमांक DMU/२०२०/CR-९२/DISM-१/ दिनांक १७/०४/२०२०
५. या कार्यालयाचे आदेश क्रमांक २०२०/उपचिटणीस/एमएजी-३/सीआर-२६ दिनांक १९/०४/२०२०
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांचे आदेश क्रमांक DMU/२०२०/CR-९२/DISM-१/ दिनांक १८/०४/२०२०
७. या कार्यालयाचे आदेश क्रमांक २०२०/उपचिटणीस/एमएजी-३/सीआर-२६ दिनांक २०/०४/२०२०
८. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग यांचे आदेश क्रमांक क्रमांक DMU/२०२०/CR-९२/DisM-१/ दिनांक २१/०४/२०२०

---

जा.क्र.२०२०/उपचिटणीस/एमएजी-३/सीआर-२६

दि. २१/०४/२०२०

विषय:- उस्मानाबाद जिल्हयात घरोघरी जावून वृत्तपत्राचे वितरण करणेबाबत

**आदेश:-**

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक ३ अन्वये जिल्हाधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात (कोव्हिड १९) या संसर्गजन्य आजारावर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्रमांक ४ अन्वये सर्वसामान्य नागरीकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमीत केल्या असून त्याची अंमलबजावणी दिनाक २० एप्रिल २०२० पासून करण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने संदर्भ क्रं. ५ च्या आदेशान्वये लॉकडाऊनच्या कालावधीत करावयाच्या उपाययोजनांबाबत सविस्तर आदेश निर्गमित करण्यात आला आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्रमांक ७ अन्वये महाराष्ट्र शासनाने कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वृतपत्रे व मासिके यांचे घरोघरी जावून वितरीत करण्यास प्रतिबंध केला आहे.

ज्याअर्थी, संदर्भ क्रमांक ८ अन्वये महाराष्ट्र शासनाने संदर्भ क्रमांक ६ च्या शासन आदेशात पुढील प्रमाणे सुधारणा केली आहे. प्रिंट मिडीयास दिनांक २०/०४/२०२० पासून सुरु होणा-या लॉकडाऊन मधून सूट देण्यात आली आहे. तसेच घरोघरी जावून वृत्तपत्राचे वितरण करावयाचे झाल्यास वृत्तपत्र घेणारी व्यक्ती व वृत्तपत्र वितरण करणारी व्यक्ती दोघांनीही मास्कचा आणि हॅन्ड सॅनिटाझरचा वापर केला पाहिजे. तसेच सामाजिक अंतरदेखील ठेवले पाहिजे.

त्याअर्थी, मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण उस्मानाबाद, भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम, १८९७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार संदर्भ क्रमांक ७ अन्वये दिलेला आदेश रद्य करीत आहे. तसेच कोरोना कोव्हिड-१९ या विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून संदर्भ क्रमांक ८ अन्वये महाराष्ट्र शासनाने दिलेल्या सुधारीत आदेशानुसार उस्मानाबाद जिल्हयात घरोघरी जावून वृत्तपत्राचे वितरण करावयाचे झाल्यास वृत्तपत्र घेणारी व्यक्ती



Scanned by CamScanner

व वृत्तपत्र वितरण करणारी व्यक्ती दोघांनीही मास्कचा/स्वच्छ रुमाल आणि हॅन्ड सॅनिटाझरचा वापर केला पाहिजे तसेच सामाजिक अंतरदेखील ठेवले पाहिजे असे आदेशीत करीत आहे.

सदरील आदेशाचे कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा संघटना यांनी उल्लंघन केल्यास त्यांच्याविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१, महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२० चे नियम ११ तसेच भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यास ते पात्र राहतील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ करण्यात यावी.

हे आदेश दिनांक २१/०४/२०२० रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमीत करण्यात आले आहेत.

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रतिलिपी, माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद
२. पोलिस अधिक्षक, उस्मानाबाद.
३. INCIDENT COMMENDER तथा उपविभागीय दंडाधिकरी, जि. उस्मानाबाद
४. INCIDENT COMMENDER तथा तालुका दंडाधिकारी जि.उस्मानाबाद
५. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद
६. मुख्याधिकारी, नगर पालिका, उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा, लोहारा, मुरुम, भुम, परंडा, वाशी ,कळंब यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

21/4/20
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

Scanned by CamScanner